# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, छत्रपती संभाजीनगर रोड, अहमदनगर .

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - २१ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं. ६७** **दिनांक : १०/०९ /२०२४**

**विभाग** : बांधकाम विभाग

**प्रस्तावाचा विषय :-** महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान (राज्यस्तर) २०२३-२०२४ प्रकल्प अंतर्गत मंजूर कामाबाबत.

---*---

**ठराव :-** महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान (राज्यस्तर) २०२३-२०२४ प्रकल्प अंतर्गत मंजूर कामाबाबत नगर विकास विभाग ,महाराष्ट्र शासन यांचे महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान (राज्यस्तर) सन २०२३-२०२४ अंतर्गत रूपये १५०.०० कोटी च्या कामास प्रशासकीय मान्यता दि.२६/०२/२०२४ ची प्राप्त झाल्यानुसार व त्यातील निंदेशानुसार तातडीने ९० दिवसात निविदा काढणे व ९१ व्या दिवशी प्रत्यक्ष कार्यारंभ ओदश देवून काम चालू करणे या दृष्टीने सर्व नियोजन करून नियमानुसार सर्व कार्यावाही केली आहे.

यामधील कामाबाबत दिनांक २२/०७/२०२४ रोजी नगर शहर शिवसेना यांनी तक्रार पत्र देवून या मध्ये नमुद केले आहे की,निविदा नियमानुसार राबविलेली नसुन स्पर्धा झालेली नाही.तसेच झालेल्या कामांवर पुनश्च निधी टाकलेला आहे,मनपा हिस्सा बाबत कोणतेही नियोजन नाही,काही कामे दुबार असतांना व कार्यादेश दिलेले असताना व काहींचे दोष दायित्व संपलेले नसतांना देखील काम प्रस्तावित केलेले आहे, महानगरपालिकेच्या बांधकाम विभागाकडे पुरेशे तांत्रिक मनुष्य बळ उपलब्ध नाही,त्यामुळे सदर प्रकल्प इतर विभागात देण्यात यावा आशा विविध तक्रारी करण्यात आलेल्या आहेत.

या अनुशंगाने महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान (राज्यस्तर) यापुर्वी सन २०११ मध्ये मनपास ७० कोटीचा निधी प्राप्त झालेला होता व तो प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण झालेला आहे.तदनंतर नगर विकास विभाग यांचे दि.४ फेब्रुवारी २०१९ च्या पत्रानुसार १०० कोटीच्या प्रस्तावासाठी मा.महासभेच्या मान्यतेने निविदा प्रक्रिया करून मानव सेवा कन्सल्टंट यांची नेमणूक करण्यात आली.त्यामध्ये पुनःश्च मा.महासभा ठरावानुसार १५० कोटीची कामे सुचवणे व मानव सेवा कन्सल्टंट यांच्या ऐवजी अथर्व इन्फ्रा इंजिनिअरिंग यांना नेमणूकीस मान्यता दिली.त्यानुसार मूळ प्रकल्प २०१९ पासून चालू होउन त्यामध्ये वेळोवेळी कामांमध्ये विविध कामे सुचवणे बदल करणे किंवा रद्द करणे इत्यादी विविध कार्यवाही झालेली आहे त्यामुळे २०१९ ते २०२४ या पाच ते सहा वर्षाच्या कालावधीत निधी प्रत्यक्ष प्राप्त होउन मंजुरीस बराच कालावधी लागला.

प्रत्यक्ष निधी प्राप्त होण्यास लागलेला कालावधी पाहता व मनपामध्ये निधी उपलब्ध नसल्या कारणामुळे व विविध रस्त्यांची भूमिगत कामे झाल्यामुळे झालेली दुरावस्थे मुळे होणारे आंदोलने व कामांची मागणी तसेच वेळोवेळी च्या ठरावान्वये मा.महापौरांना दिलेले आधिकार व काही कामे हे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत निधी वर्ग झाल्याने त्यांनी ना हरकत इत्यादीमुळे त्या त्या वेळेची तातडी पाहता कामांना मंजुरी देण्यात आलेली आहे.

तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाला काही कामांना देखील ना हरकती देण्यात आलेले आहे. व सदरचे मंजुर झालेले व नाहरकत दिलेले कामांच्या तरतुदी या त्रोटक स्वरूपातील असून डांबरीकरण स्वरूपातील आहे.त्यामुळे त्यांचे दोषदायीत्व व कामाचे आर्युमान हे कमी कालावधीचे रहाणार आहे.शासनाकडून प्राप्त झालेला निधी हा संकल्पनेवर आधारीत असल्याने व रस्ता कॉक्रीटीकरण स्वरूपात असल्याने सदर कामाचे दोषदायीत्व हा मुळातच सात वर्षाचा असून त्याचे आर्युमान किमान विस वर्ष राहणार आहे. त्यामुळे जरी काही कामे हे इतर निधीमध्ये मंजुर असले तरी ते काम सध्या करणे योग्य होणार नाही असे इकडील मत आहे.व सदर मंजुर कामांवर जरी काही कालावधी पुर्वी रस्ते झालेले असले व त्याचे दोषदायीत्व संपलेले नसले तरी त्याबाबतचे आर्युमान पाहता मंजुर झालेल्या प्रकल्पातील रस्ता करणे हे यथा योग्य आहे.

महानगरपालिकेकडे मनुष्यबळ नसल्याने या कामावर मे.अथर्व इंन्फ्राट्रक्चर यांना कार्यादेश दिलेला आहे.त्यामुळे संपुर्ण तांत्रीक मनुष्यबळ हे त्या पी.एम.सी.चे असणार आहे.

सदर कामांबाबत ऑनलाईन पध्दतीने ई निविदा राबवून शासन मान्यतेमध्ये दिलेले सर्व सोपस्कार पार पाडून निविदा नियमानुसार राबविलेली आहे.

मनपा हिस्सा सदर प्रकल्पासाठी ७०+३० प्रमाणात असून तो सुमारे एकुण प्रकल्पाचे ३० टक्के म्हणजे ४५ कोटी जरी असला तरी सदर प्रकल्पासाठी राज्य शासनाने महानगरपालिकेचे राज्य शासनाचा हिस्सा मंजुर केल्यानंतर त्यामधून खर्च करतांना प्रत्येक टप्यावर प्रत्येक देयकामध्ये राज्य शासनाच्या माध्यमातुन जेवढी रककम प्रदान होणार आहे.त्याप्रमाणात महानगरपालिकेने स्वतःची रक्कम प्रदान करावी त्यामुळे या योजनेत अहमदनगर महानगरपालिकेचा हिस्सा एकाच वेळेस भरण्यात वेळ येणार नाही.

तसेच मंजूर २४ कामांमध्ये इतर निधी मध्ये कार्यादेश असलेल्या कामापैकी भिंगारवाला चौक ते तेलीखुंट हा रस्ता मुलभुत सुविधा मधून जरी प्रस्तावीत असला तरी त्यामंजुर कामांमधील विविध कामांकरीता पुर्ण करण्याकरीता सर्व रक्कम लागणार असल्याने सदर कामांमधून कापडबाजाराचा रस्ता होवू शकणार नाही. किंवा जरी झाला तरी त्याचे आर्युमान अल्प प्रमाणात असणार असल्याने सदरचे काम त्या ठिकाणी न करण्या बाबत निर्णय घेणे योग्य त्याचे बरोबर सर्जेपुरा चौक ते तेलीखुंट हा रस्ता देखील रू. १० - १२ लक्ष रूपयांचा जिल्हास्तर नगरोत्थान मधून मंजुर असला तरी सदर रस्ता देखील फक्त डांबरीकरण त्रोटक स्वरूपातील तरतुदींचा असल्याने तो देखील रस्ता त्या ठिकाणी न करणे बाबतचा निर्णय घेणे योग्य वाटते तसेच गांधी मैदान ते चितळे रोड ते आमरधाम पर्यतचा प्रकल्प आपलयाकडे मंजुर असल्याने व त्याची नाहकत काही लांबीमध्ये भुमीगत गटर करण्यासाठी सार्व.बांधकाम यांना दिलेले असल्याने त्यांना त्यांच्याकडून भुमीगत गटर करणे व उर्वरीत लांबीची गटर व त्यावरील संपुर्ण रस्ता महानगरपालिकेचा महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान (राज्यस्तर) मधून करणे योग्य वाटते.महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग यांचा अहवालामध्ये नमुद मंजुर असलेल्या व दोषदायीत्व असलेल्या कामांबाबत प्रस्तावित केलेला अहवालास मा.प्रशासक सर्वसाधारण सभेची मंजूरी देण्यात येत आहे.

**निर्णय :-**

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

| | |
|---|---|
| सही/- | सही/- |
| (मेहेर लहारे) | (यशवंत डांगे) |
| प्र.नगरसचिव | आयुक्त तथा प्रशासक |
| अहमदनगर महानगरपालिका. | अहमदनगर महानगरपालिका. |

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, संभाजीनगर रोड, अहमदनगर महानगरपालिका. अहमदनगर.

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - २१ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं. ६८** **दिनांक : १०/०९ /२०२४**

**विभाग** : शहर पाणी पुरवठा विभाग

**प्रस्तावाचा विषय :-** मा. शासनाकडून प्राप्त होणा-या १५ व्या वित्त आयोगाच्या अनुदानातून केडगांव उपनगरच्या वाढीव भागासाठी पाणी पुरवठा योजनेच्या प्राप्त प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत.

---*---

**ठराव :-** मा.शासनाकडून प्राप्त होणा-या १५ व्या वित्त आयोगाच्या अनुदानातुन पाणी पुरवठा विषयक कामे प्रस्तावित करणेचे अनुषंगाने मा.सभापती स्थायी समिती यांचे मागणी नुसार केडगांव परीसरामध्ये तीन ठिकाणी उंच टाक्या उभारणे व पाईपलाईन इत्यादी कामे प्रस्तावित करण्यासाठी कळविले होते.या अनुषंगाने वर्कीग सर्व्हे करण्यासाठी दरपत्रकेमागवून सी.एन.बारवकर सर्व्हेयर ॲण्ड इंजिनीयर्स अहमदनगर या एजन्सीची नेमणूक करून केडगांव परिसरामध्ये खालील प्रमाणे नमुद चार ठिकाणी सर्व्हे करून आराखडे तयार करण्यात आले.
१.ओंकारनगर ते कांबळे मळा,नगर - सांलापूर बायपास लगत २. मोहिनी नगर ते इंदिरा नगर,नगर-दौण्ड महामार्गालगत ३.कांबळे मळा ते कापरे वस्ती ४.लोंढे मळा ते मतकर वस्ती

उपरोक्त नमुद ठिकाणी पाणी पुरवठा योजना राबविणे कामी आवश्यक असलेल्या निधीची तरतुद हि १५ वा वित्त आयोगातून प्राप्त अनुदानातुन करणे कामी मा.महासभा प्रस्ताव क्र.२८ दिनांक ३०/०३/२०२२ अन्वये ठराव पारित झालेला आहे.विषयांकीत कामाची अंमलबजावणी करण्यासाठी प्रकल्प अहवाल तयार करणे आवश्यक असल्याने सदरचा नविन प्रकल्प अहवाल तयार करणे कामी मा.स्थायी समिती प्रस्ताव क्रमांक ०९ दि.१८/०४/२०२२ अन्वये झालेल्या ठरावानुसार ठरावात नमूद यश इनोव्हेटींग एजन्सी मार्फत प्रकल्प अहवाल तयार करणे करिता कार्यारंभ आदेश देण्यात आला होता.

यश इनोव्हेटीव्ह सोल्युशन,औरंगाबाद यांनी शुध्द पाणी गुरूत्ववाहिनी शुध्द पाणी उर्ध्ववाहिनी ,मतकर वस्ती यैथे संप व पंपहाउस,मतकर वस्ती येथे शुध्द पाणी पंपींग मशिनरी एक्सप्रेस फिडर,मतकर वस्ती व इंदिरानगर येथे उंच टाकी इत्यादी उपांगे समाविष्ठ असलेला रू११.०१ कोटींचा प्रकल्प अहवाल सादर केलेला आहे. या प्रकल्प अहवाला मधील इंदिरानगर उंच टाकी व टाकी भरणे करिताची गुरूत्ववाहिनी व्यतिरीक्त इतर उपांगाचा समावेश सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत या योजनेत केलेला आहे.त्यामुळे इंदिरानगर उंच टाकी उभारणे व गुरूत्वाहिनी अंथरणे या कामाचे रू.२.६४ कोटींचे स्वतंत्र अंदाजपत्रक यश इनोव्हेटीव्ह सोल्युशन ,औरंगाबाद यांचंकडून करून घेण्यात आलेला आहे.मा.महासभा प्रस्ताव क्र.२८ दि.३०/०३/२०२२ अन्वये पारीत ठरावानुसार रू.२.६४ कोटीचे अंदाजपत्रकास मा.प्रशासक सर्वसाधारण सभेची मंजूरी देण्यात येतआहे.

**निर्णय :-**

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
(मेहेर लहारे)
प्र.नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका.

सही/-
(यशवंत डांगे)
आयुक्त तथा प्रशासक
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

प्रशासकीय इमारत, संभाजीनगर रोड, अहमदनगर महानगरपालिका. अहमदनगर.

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - २१ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं. ६९** **दिनांक : १०/०९ /२०२४**

**विभाग** : बांधकाम विभाग

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका सार्व.बांधकाम विभाग प्रस्तावित ई निविदांचे अनामत रक्कम (एफ.डी.आर.) रोखीने भरलेले तसेच बीलातून कपात झालेल्या व्यापगत रकमा परतावा करणे बाबत.

---*---

**ठराव :-** मे. गुलशन कंस्ट्रक्शन, अहमदनगर यांनी केलेल्या कामांचे दोषदायित्व कालावधी संपल्यानंतर अनामत रक्कम परत मिळणेबाबत मागणी केलेली आहे. परंतू सदरची भरून घेण्यात आलेली रक्कम यांस ३ वर्षापेक्षा जास्त कालावधी झालेला असलेने सदरच्या ठेवी व्यपगत ठेवी मध्ये जमा झालेल्या आहेत.महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता २०११ मधील नियम क्रमांक २९९ अन्वये अनामत रक्कम इत्यादी यांना परत देण्याकरीता मा.महासभेची मान्यता घेणे आवश्यक आहे.

तरी महानगरपालिकेकडे मे. गुलशन कंस्ट्रक्शन, अहमदनगर यांची ई निविदा क्रं. २२४५ अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील **१.**प्रभाग क्र. १७ मधील प्लॉट नं.२३ चोभेघर ते नगर- दौण्ड हायवे पर्यत रस्ता डांबरीकरण करणे, **२.** ई निविदा क्रमांक २२४२ अ) प्रभाग क्र.१४ मधील वाकोडी रोड ते दुग्गड कंम्पौड (भोसले सांस्कृतीक भवन ) पर्यत रस्ता डांबरीकरण करणे ब) प्र.क्र.१४ मधील बुरूडगांव रोड ते चंगेडे ते पठाण ते बोथरा ते झंवर ते अग्रवाल ते बारणे आणि कटारीया ते जयपुर गोडावून पर्यत रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे.**३.** ई निविदा क्रमांक २२६१ प्र.क्र.१७ मधील झेड.पी.कॉलनी जवळ लाला गायकवाड ते ऑईल कंपनी रोडजवळ ओपनस्पेस आणि कोर्ट कॉलनी जवळ फुलसौंदर ते ऑईल रस्त्या पर्यत ३००एम. एम. एन.पी.२ आर.सी.सी.पाईप गटर करणे.या तीन कामांच्या अनामत रक्कम अदा करणेस मा.प्रशासक सर्वसाधारण सभा मंजूरी देंत आहे.

**निर्णय :-**

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
(मेहेर लहारे)
प्र.नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका.

सही/-
(यशवंत डांगे)
आयुक्त तथा प्रशासक
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग
प्रशासकीय इमारत, संभाजीनगर रोड, अहमदनगर महानगरपालिका. अहमदनगर.

**मा.प्रशासक यांजकडील मा.महासभा क्रमांक - २१ विषयाबाबतचे निर्णय.**

**मा.प्रशासक ठराव क्रं. ७०** **दिनांक : १०/०९ /२०२४**

**विभाग** : बांधकाम विभाग

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील नगररचना योजना क्र.४ अंतिम भूखंड क्र १२९ (पैकी)सावेडी ,प्रोफेसर कॉलनी चौक येथे बंदिस्त नाटयगृहाचे काम निविदा शर्त ३(c) नुसार मे ए.सी.कोठारी यांचे कडून काम काढून घेवून ,उर्वरित कामाची ई निविदा कार्यवाही करणे बाबत...

**ठराव :-**

अहमदनगर महानगरपालिका बांधकाम विभाग जा.क्र.८३ दिनांक २९/०७/२०१३ नुसार मे ए.सी.कोठारी ,इंजिनीयर ॲण्ड कॉन्ट्रॉक्टर यांना अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील नगररचना योजना क्र.४ अंतिम भूखंड क्र १२९ (पैकी)सावेडी ,प्रोफेसर कॉलनी चौक येथे बंदिस्त नाटयगृहाचे काम कारणे बाबत चा कार्यारंभ आदेश देण्यात आला.सदर कामाची मुदत १८ महिने होती.त्यानंतर वेळोवेळी मुदत वाढ देण्यात आली.सदर नाटयगृहास शासनाकडून व मनपाकडून रू.०.६०+३.१५+५.०असे एकुण ८.७५ कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आलेला आहे.ठेकेदार मे ए.सी.कोठारी यांना आत्तापर्यत एकुण रक्कम रू.४,९३,६९,६९२/- अदा करण्यात आली आहे.या कामासाठी पुरेसा निधी म्हणजे रू.८.७५ काटी -४.९३ कोटी ३.८२ कोटी निधी उपलब्ध आहे.सदरचे काम पुर्ण करण्याची मा.आमदार,मा.महापौर,मा.पदाधिकारी व शहरातील नाटयसंस्था यांचे कडून इकडेस वारंवार विचारण केली जाते व नाराजी व्यक्त केली जाते , विविध नाटय संस्थांनी व राजकीय पक्षांनी आंदोलन केलेली आहेत.त्यामुळे मनपास रोषास सामोरे जावे लागत आहे व महानगरपालिकेची नाहक बदनामी होत आहे.सध्याचे ठेकेदार यांनी कोणतेही कारण नसतांना काम बंद ठेवलेले आहे.सातत्याने दुरध्वनीव्दारे तसेच पत्राव्दारे सुचना देवून व पाठपुरावा करूनही कामाकडे जाणीवपुर्वक र्दुलक्ष करत असल्याचे दिसून येत आहे.या कामाकरीता निधी उपलब्ध असून देखील बांधकामास विलंब केलेला आहे.अनेंक वेळा नोटिस देवूनही कामामध्ये कोणत्याही प्रकारे प्रगती केलेली नाही.

मे ए.सी.कोठारी ,इंजिनीयर ॲण्ड कॉन्ट्रॉक्टर यांचे कडील नगररचना योजना क्र.४ अंतिम भूखंड क्र १२९ (पैकी) सावेडी ,प्रोफेसर कॉलनी चौक येथे बंदिस्त नाटयगृहाचे काम कांढुन घेणेकरीता व आहे त्या स्थितीत अंतिम करणे करीता संयुक्त पाहणी साठी निविदा शर्त ३(c) नुसार उपस्थित रहाणे बाबत वेळोवेळी नोटीस देण्यात आली.परंतु संयुक्त पहाणी करीता ठेकेदार किंवा त्यांचे प्रतिनीधी उपस्थित राहीले नाही. यावरून त्यांची काम करण्याची मानसिकता नसल्याचे दिसून येते.त्यामुळे सदर ठेकेदार यांचेकडून निविदा शर्त ३(c) नुसार काढून घेवून त्यानंतर पुढील कार्यवाही करणे कामी संयुक्त पहाणी करणे कामी जा.क्र.१४६ दि.२३/०४/२०२४,जा.क्र.१७५ दिनांक २६/०४/२०२४ व जा.क्र.६१६ दि.२०/०६/२०२४ अन्वये ठेकेदार यांना संयुक्त पहाणी करीता तीन वेळा कळविण्यात आले.त्यानंतर दिनांक २९/०४/२०२४ रोजी ठेकेदार यांनी पत्र देवून आम्ही संयुक्त मोजणी साठी हजर राहण्यास तयार आहोत व उर्वरीत कामासाठी आपल्या स्तरावर योग्य कार्यवाही करणे बाबत कळविले होते तसेच आमच्यावर कोणत्याही प्रकारची दंडात्मक कारवाई करू नये असे कळविले आहे.त्यानंतर संयुक्त पाहणी करिता बोलविले असता कामाच्या साईटवर पाहणीकरीता श्री.आदेश कोठारी ,मनोज जाधव ,मनोज पारखे यांच्या उपस्थित उर्वरित कामाचा मोजमापाबाबत त्यांनी कामाचे आर्किटेक

श्री.मनोज जाधव यांनी आज पर्यत दिलेल्या देयकातील मोजमापे बरोबर असले बाबत सांगीतले आहे व पुढील काम करण्याबाबत मानसिकता दाखवलेली नाही .ठेकेदार वारंवार सुचना देवूनही ठेकेदार काम पुर्ण करत नसुन केवळ टाळाटाळ करित आहे.सदरचे काम तातडीने पूर्ण करणे करिता मा.लोकप्रतिनिधी व नागरीकांनी अत्यंत रोषपूर्वक व तीव्र मागणी करत आहे व नाराजी व्यक्त केली जाते त्यामुळे मनपास त्यांच्या रोषास सामोरे जावे लागत आहे.नाटयगृह चे बांधकाम करणे हे शहराचे नावलौकिक होण्यास व शहराचे वैभव वाढविण्यास मदत होणार आहे.त्यामुळे नाटयगृह बांधकामाचे काम करणे.अहमदनगर शहरवासीयांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे आहे.

संयुक्त पाहणी करीता व झालेल्या कामाचे मुल्यांकन व उर्वरित कामाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यायरीता श्री.मनोज जाधव ,आर्किटेक्ट,अविष्कार ग्रुप यांना कळविण्यात आले होते.त्यानुसार त्यांनी उर्वरीत कामाचे चालू दरसूचीनुसार सविस्तर अंदाजपत्रक इकडेस सादर केले आहे.चालू दरसुचीनुसार करण्यात आलेले आंदाजपत्रकास मा.शहर अभियंता यांची तांत्रिक मान्यता घेवून पुढील कार्यवाही करणे योग्य त्यानुसार सविस्तर अहवाल खालील नमुद तक्त्यामध्ये नमूद करण्यात आला आहे.

| कामाचे अंदाजपत्रक | आत्तापर्यत झालेल्या कामाची रक्कम | उर्वरित कामाची रक्कम | नविन अंदाजपत्रकानुसार उर्वरित कामाची रक्कम | जादा लागणारी रक्कम |
|---|---|---|---|---|
| ७२२१९४१३ | ३८५८१३३६ | ३३६३८०७६ | ६५७६१०९५ | ३२१२३०१९ |

सदर कामासाठी मनपाकडे जमा असलेली सुरक्षा अनामत व इतर अनामत रक्कम रू.३७५९८४३/-एवढी रक्कम या कामापोटी मनपाकडे शिल्लक आहे.सदरचे काम निविदा शर्त ३(c) नुसार संबंधित ठेकेदार मे.ए.सी कोठारी,इंजिनीयर ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर ,आनंद अपार्टमेंट ,सहकार सभागृह, अहमदनगर यांचेकडून नाटयगृह बांधणेचे काम काढून घेवून काम रद्द करून या कामासाठी जादा लागणारी रक्कम मे.ए.सी.कोठारी यांची महानगरपालिकेकडे असलेली विविध देयके व अनामत रकमा यामधून वसूल करणेस तसेच उर्वरित कामाची चालू दरसूची नुसार नव्याने ई - निविदा कार्यवाही करणेस कायदेशीर प्रक्रिया राबवून याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी. यास मा.प्रशासक सर्वसाधारण सभेची मंजूरी देण्यात येत आहे.

---*---

**निर्णय :-**

महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२३/प्र.क्रं.४३१/ नवि-१४ मंत्रालय (मुख्य इमारत) मुंबई -३२ दिनांक २८/१२/२०२३ आदेश अन्वये प्राप्त अधिकारानुसार मा.महासभेच्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त ठरावास मा.प्रशासक यांनी मंजुरी दिली.

सही/-
(मेहेर लहारे)
प्र.नगरसचिव
अहमदनगर महानगरपालिका.

सही/-
(यशवंत डांगे)
आयुक्त तथा प्रशासक
अहमदनगर महानगरपालिका.